स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयाच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणारा शोधप्रबंध आराखडा.

संशोधन शीर्षक

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या ‘केसरी’तील निवडक अग्रलेखांचा चिकित्सक अभ्यास.

संशोधक

संतोष लक्ष्मण राणे

एम.ए. (मराठी), बी.एड., सेट,

सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग

जोशी-बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालय, जि. ठाणे

मार्गदर्शक

डॉ. माधव बसवंते

एम.ए. (मराठी), एम.एड., एम.जे.एम.सी., नेट., पीएच.डी.

सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड,

जि. नांदेड

एप्रिल - २०१९

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'केसरी'तील निवडक अग्रलेखांचा चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

'असंतोषाचे जनक' म्हणून संपूर्ण भारतभर प्रसिद्ध असलेल्या लोकमान्य केशव बाळ (बळवंत) गंगाधर टिळक यांच्याविषयी आजही जनसामान्यांमध्ये कुतूहल आहे. लोकमान्य टिळकांचे व्यक्तीमत्त्व विलक्षण होते. लोकमान्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू होते. या व्यक्तिमत्त्वांचे विविधांगी कंगोरे अचंबित करणारे आहेत. 'स्व' राज्याचा जन्मसिद्ध हक्क जनतेला मिळावा व स्वातंत्र्याच्या साहाय्याने प्रजेने आपला सर्वंकष उद्धार साधावा ही टिळकांची तळमळ होती. तेल्या-तांबोळ्यांचे (बहुजन समाजाचे) नेतृत्त्व लोकमान्यांनी यशस्वीपणे केले. लोकहितासाठी अखंड परिश्रम, कार्यतत्परता, अमर्याद त्याग, त्या त्यागातून निर्माण होणारा आवेश, परकिय शक्तीवर आपल्या लेखणीतून प्रहार करण्याची अमर्याद शक्ती लोकमान्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग होती. केशव गंगाधर टिळक यांचा जन्म २३ जुलै १८५६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील चिखली या गावी झाला. केशव गंगाधर टिळक ते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हा प्रवास म्हणजे 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असाच आहे.

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' ह्या संदेशाने सारा भारत देश ढवळून निघाला, हे सत्य नाकारता येत नाही. टिळकांनी इ.स.१८८० साली देशसेवेला सुरुवात केली. इ.स. १८८१ मध्ये त्यांनी 'केसरी' आणि 'मराठा' ही दोन वर्तमानपत्रे सुरु केली. ह्या वर्तमानपत्रांतील त्यांच्या सत्य व निर्भिड विचारांमुळेच ब्रिटिश सरकारने त्यांच्यावर अनेकवेळा देशद्रोहाचे खटले भरुन त्यांना तुरुंगात पाठविले होते. भारतीयांच्या मनात ब्रिटीश सत्तेविरुद्ध त्यांनी तीव्र असंतोष निर्माण केला. या असंतोषामागे टिळकांनी लिहिलेल्या अनेक अग्रलेखांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली दिसते. या वज्रमुठी अग्रलेखांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्याला योग्य दिशा दिली, हे मान्य

करावेच लागेल. महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य प्रेरणेची बीजे लोकमान्य टिळकांच्या ‘सिंहगर्जनेत’ होती, हे अमान्य करता येणार नाही.

लोकमान्य टिळकांची त्यागी वृत्ती, अफाट धैर्य, दुर्दम्य उत्साह, नैतिकता, निष्कलंक चारित्र्य आणि समाजसेवा अद्वितीय आहे. अशा बहुआयामी व्यक्तीमत्त्वाने बौध्दीक, सामाजिक व राजकीय जीवनात स्वतंत्र इतिहास निर्माण केला. या इतिहासातील सुवर्णपान म्हणजे ‘केसरी’ वृत्तपत्रातील अनेक अग्रलेख. ‘केसरी’ वृत्तपत्रातील निवडक अग्रलेखांचा भाषेच्या सौंदर्यदृष्टीने अभ्यास करण्याची संधी मिळाली तर लोकमान्यांच्या आणखी एका विशेष पैलूवर प्रकाशझोत पडू शकेल, असा संशोधकाला विश्वास वाटतो.

संशोधन निवडीची भूमिका :

“चार जबरदस्त वृत्तपत्रे हजारो संगिनीना निष्प्रभ करु शकतात.” इति नेपोलियन...

नियतकालिकांचे मानवी जीवनातील स्थान अनन्यसाधारण आहे. लेखणीच्या सामर्थ्याला ‘Pen is mightier than the sword’ (तलवारीपेक्षा शक्तिशाली) असे म्हटले गेले. अठराव्या शतकातला प्रसिद्ध आंग्ल लेखक थॉमस कार्लाईलने आपल्या ‘द हीरोज अॅण्ड वर्शिप’ या निबंधात ‘द हिरो अॅज मॅन ऑफ लेटर्स (लेखक हेच नेते) असे म्हटले आहे.

मानवी जीवनाचे नियमन करणाऱ्या ‘लॉर्ड्स् स्पिरिच्युअल’ (धर्मगुरु), ‘लॉर्डस् टेंपारेल’ (वरिष्ठ सभागृह),‘कॉमन्स’ (लोकसभा) या तीन स्तंभाप्रमाणे नव्हे तर त्यांच्यापेक्षाही अधिक महत्त्वाचा स्तंभ म्हणजे ‘वृत्तपत्रे’ (प्रेस गॅलरी) असे सुप्रसिद्ध पत्रकार व खासदार एडमंड बर्क यांनी म्हटले आहे. त्यांच्या नंतर मेकॉलेनेही १८२८ मध्ये ‘कॉन्स्टिट्यूशनल हिस्ट्री’ या निबंधातही ‘चौथा स्तंभ’ हा शब्दप्रयोग केला होता. अशा प्रकारे एकोणिसाव्या शतकापासून वृत्तपत्रे म्हणजे ‘चौथा स्तंभ’ असा वाक्प्रचार रुढ झाल्याचे दिसून येते.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीत इतर अनेक देशांप्रमाणेच भारतीय वृत्तपत्रांनी परकीय शासनसंस्थेच्या शोषक कारभाराची पाळेमुळे उघड केली. त्यासाठी अग्निदिव्य पत्करले. एका बाजूने लोकमत जागृत करण्याची व दुसऱ्या बाजूने त्या लोकमताचे संघटित दडपण शासनावर पाडण्याची

अवघड कामगिरी भारतीय पत्रकारितेने केलेली आहे. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील आघाडीच्या नेत्यांनी चळवळीचे एक साधन म्हणून वृत्तपत्राचाच वापर केला.

लोकमान्य टिळकांनी 'केसरी व मराठा' या वृत्तपत्रांतून ब्रिटीश शासनकर्त्यांना सळो की पळो करून सोडले. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी 'हरिजन', 'यंग इंडिया', 'नवयुग' ही वृत्तपत्रे संपादित केली. भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु हे 'नॅशनल हेरॉल्ड' या वृत्तपत्राचे संपादक होते. मौलाना आझाद हे 'अलहिलाल' नियतकालिकाचे संपादक होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'मूलनायक' 'बहिष्कृत भारत' 'जनता' ही वृत्तपत्रे चालविली.

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी 'केसरी व मराठा' या वृत्तपत्रांतून ब्रिटीश शासनकर्त्यांवर घणाघाती प्रहार केले. 'केसरी' तील अनेक अग्रलेखांचा विचार करताना जहालमतवादी लोकमान्य टिळकांना 'राष्ट्रीयत्वाचा शिल्पकार' मानले गेले. टिळकांनी स्वातंत्र्यलढ्याला तात्त्विक अधिष्ठान मिळवून दिले. या तात्त्विक अधिष्ठानाची पाळेमुळे 'केसरी'तील अग्रलेखात सापडतात. हाच धागा पकडून 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या केसरी वृत्तपत्रातील निवडक अग्रलेखांचा चिकित्सक अभ्यास' करण्याचे ठरविले आहे. आपल्या 'स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात' या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले आहे. प्रस्तुत संशोधन करताना आजची पत्रकारिता नेमकी कुठे चालली आहे, याचाही शोध घेता येईल, असे वाटते. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' असा घणाघाती हल्ला करणारे संपादक लोकमान्य टिळक होते. पण आजच्या सरकारचे डोके ठिकाणावर नसून सुद्धा आजचे संपादक, पत्रकार असा प्रश्न विचारण्यास कचरत आहेत. दुर्दैवाने आजच्या वृत्तपत्रातील संपादक, पत्रकार राजकारण्यांच्या दावणीला बांधलेले आहेत. निवडणुकीच्या धामधुमीत काही वरिष्ठ संपादक नेत्यांच्या मुलाखती जेवता-जेवता घेत आहेत. अशा पत्रकारितेत कोणते सत्य बाहेर येईल? 'बोलाची कढी आणि बोलाचा भात' शिवाय हाती काहीही लागणार नाही.

रंगीत पुरवण्याच्या नादात समाजाला दिशादर्शक असे संपादकीय हरवले आहे. 'मालक बोले संपादक डोले' अशी आजच्या संपादकांची अवस्था झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारितेत एक दरारा होता, धाक होता, चारित्र्य होते. आज पत्रकारितेच्या 'दर्पणा' त पाहताना "सियासत सुरतों

पर इतना ऐहसान करती है की पहले आँखे निकाल लेती है... और चष्मे दान करती है" अशी अवस्था असूनही या व्यवस्थेविरुद्ध ब्र काढण्याची हिंमत संपादकांमध्ये राहिलेली नाही, असे खेदाने म्हणावे लागते. संपादकांचे जे मूळ कूळ आहे, त्या कुळाचा धर्म आजचे संपादक, पत्रकार मानतात का? त्यांची वाटचाल त्या कुळाला शोभेल अशी होत आहे का? दुर्दैवाने याचे उत्तर नाही असेच मिळते. लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखांचा विविध दृष्टीकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

'केसरी' वृत्तपत्राचा कालावधी जानेवारी १८८१ ते ऑगस्ट १९२० असा ३९ वर्षांचा आहे. या कालावधीत ५१३ अग्रलेख प्रकाशित झाले.

'लोकांना आपले राजकीय हक्क स्वत:च मिळवावे लागतात. त्यासाठी जनशक्ती संघटित करावी लागते' हे सूत्र स्वीकारून लोकमान्य टिळकांनी सर्व सामर्थ्यांनिशी जनमत संघटित व संघर्षप्रवृत्त करण्याचा प्रयत्न केला. हाच प्रयत्न त्यांच्या 'केसरी' वृत्तपत्रातील अग्रलेखातील विविधांगी विषयात दिसतो. एकापेक्षा एक भाषसमृध्द जहाल अग्रलेखांचे बॉम्ब लोकमान्य टिळक ब्रिटीश शासनकर्त्यांवर फेकत होते. त्यामुळे ब्रिटीश शासनाने लोकमान्य टिळकांना विविध शिक्षा सुनावलेल्या होत्या. तरीही न डगमगता लोकमान्यांनी 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व मी तो मिळविणारच' ही सिंहगर्जना केली. "राजकीय सुधारणावाद" आणि "नि:शस्त्र क्रांतिवाद" असे दोन टप्पे टिळकांच्या राजकीय जीवनाचे आणि विचारांचे पडलेले दिसून येतात. या वैचारिक प्रवासात टिळकांनी परकीय सत्तेविरुद्ध जनमत प्रक्षुब्ध करण्यासाठी अग्रलेखांची मदत घेतली. म्हणूनच 'केसरी' वृत्तपत्रातील निवडक अग्रलेखांचा साकल्याने चिकित्सक अभ्यास केला तर भाषेच्या सौंदर्याचा शोध घेता येईल असा मला विश्वास वाटतो. असे संशोधन करीत असताना ध्येयाने प्रेरित असलेली स्वातंत्र्यपूर्व पत्रकारिता आणि स्वत:ची ध्येय पूर्ण करण्यासाठी राबविली जाणारी आजच्या काळातील पत्रकारितेच्या वेगळ्या प्रवासातील संभाव्य धोके अधोरेखीत करता येतील. टीआरपी वाढविण्याच्या नादात मग्न असलेली इलेक्ट्रॉनीक मिडिया आणि रंगीत जाहिरातीनी भरलेल्या पानात बातमी

शोधायला लावणारी पत्रकारिता यांच्या आजच्या ऱ्हासाची कारणे शोधण्याची संधी यामुळे मिळेल अशी संशोधकाची प्रामाणिक खात्री आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१) स्वातंत्र्यपूर्व मराठी पत्रकारितेचा इतिहास अभ्यासणे.

२) स्वराज्य प्राप्तीसाठी लोकमान्य टिळकांनी केसरी च्या अग्रलेखातून मांडलेली भुमिका अभ्यासणे.

३) केसरीच्या आग्रलेखातून लोकमान्य टिळकांची सामाजिक, राजकीय व स्वातंत्र्यविषयक भुमिका अभ्यासणे.

४) केसरीतील निवडक अग्रलेख भाषिक दृष्टीतून अभ्यासणे.

संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा :

व्याप्ती :

१) जानेवारी १८८१ ते ऑगस्ट १९२० या कालखंडात प्रकाशित झालेल्या 'केसरी' वृत्तपत्रातील अग्रलेखांपुरतेच या संशोधनाची व्याप्ती आहे.

२) संशोधनातील व्याप्ती स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील सर्व अग्रलेखांच्या चिकित्सक अभ्यासापर्यंत नेता येईल.

मर्यादा :

१) जानेवारी १८८१ ते ऑगस्ट १९२० या ३९ वर्षाच्या कालावधीत 'केसरी' वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या ५१३ अग्रलेखातील अत्यंत महत्त्वाच्या विषयावरील अग्रलेखांपुरतेच सदर संशोधन मर्यादित राहिल.

२) महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था या शासनाच्या वतीने प्रकाशनाचे काम करणाऱ्या संस्था, 'केसरी' चे मुळ अंक तसेच टिळक स्मारक, पुणे यांचेद्वारे लोकमान्य टिळक यांची प्रकाशित ग्रंथसंपदा प्रमाण मानण्यात येईल.

संशोधन पद्धती :

साहित्य संशोधनाच्या विविध पद्धती आहेत.

१)ऐतिहासिक किंवा कालक्रमनिष्ठ पद्धती, २) तौलनिक पद्धती, ३) सूक्ष्म संहिताचिकित्सा (भाषावैज्ञानिक, शैलीवैज्ञानिक) पद्धती, ४) नमुना पाहणी पद्धती, ५) क्षेत्रिय सर्वेक्षण पद्धती, ६) अनुभवाधिष्ठीत पद्धती, ७) वैज्ञानिक पद्धती, ८) समीक्षातत्त्वप्रधान संशोधनपद्धती. सदर संशोधनात प्रामुख्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल.

संशोधन साधने :

१) जानेवारी १८८१ ते ऑगस्ट १९२० पर्यंत प्रकाशित 'केसरी' च्या वृत्तपत्राचे अंक हे प्रस्तुतच्या संशोधनातील मुख्य साधने असतील.

२) या अग्रलेखांच्या अनुषंगाने इतर मान्यवरांची प्रकाशित झालेली पुस्तके, लेख, समीक्षाग्रंथ यांचा दुय्यम संशोधन साधने म्हणून प्रस्तुतच्या संशोधनात वापर करण्यात येईल.

३) केसरीतील अग्रलेखांच्या अनुषंगाने प्रकाशित झालेली वैचारिक पुस्तके.

४) तसेच लोकमान्य टिळकांचे वंशज (पणतू) डॉ. दीपक टिळक यांची मुलाखत घेऊन लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या शैलीचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण योजना :

प्रस्तुतचे संशोधन पूर्ण करण्यासाठी तसेच संशोधनाला शिस्त लागण्यासाठी पुढीलप्रमाणे प्रकरण योजना निश्चित करण्यात येत आहे.

प्रकरण पहिले : स्वातंत्र्यपूर्व मराठी पत्रकारितेचा इतिहास.

प्रकरण दुसरे : लोकमान्य टिळक यांचे जीवनदर्शन.

प्रकरण तिसरे : इ.स. १८८१ ते इ.स. १८९० या कालावधीत प्रकाशित झालेले 'केसरी'तील अग्रलेख.

प्रकरण चवथे :इ.स. १८९१ ते इ.स. १९०० या कालावधीत प्रकाशित झालेले 'केसरी'तील अग्रलेख.

प्रकरण पाचवे : इ.स. १९०१ ते इ.स. १९१० या कालावधीत प्रकाशित झालेले 'केसरी'तील अग्रलेख.

प्रकरण सहावे : इ.स. १९११ ते इ.स. १९२० या कालावधीत प्रकाशित झालेले 'केसरी'तील अग्रलेख.

प्रकरण सातवे : समारोप व निष्कर्ष

परिशिष्टे :

१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे छायाचित्र.

२. 'केसरी' वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या अग्रलेखांची दिनांक निहाय यादी.

३. लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ. दीपक टिळक यांच्या मुलाखतीची प्रश्नावली.

४. लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ. दीपक टिळक यांची मुलाखत घेताना त्यांच्यासोबतचे संशोधकाचे छायाचित्र.

५. 'केसरी' वृत्तपत्राच्या प्रथम अंकाच्या प्रथम पृष्ठाचे छायाचित्र.

६. 'केसरी' वृत्तपत्राच्या शेवटच्या अंकाच्या प्रथम पृष्ठाचे छायाचित्र.

७. टिळक स्मारक पुणे येथे संशोधकाच्या भेटीचे छायाचित्र.

संदर्भ सूची :

१. डांगे एस.ए. (१९७६), क्रांतिकारक कामगार आणि लोकमान्य टिळक, लोकवाङ्मयगृह, मुंबई

२. लोकमान्य टिळक लेखसंग्रह , सं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, साहित्य अकादमी,मुंबई

३. मराठी विश्वकोश, (खंड १ ते २१) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

४. अकलूजकर, प्रसन्नकुमार (२०००), मराठी वृत्तपत्रसृष्टीचे अंतरंग, श्रीविद्या प्रकाशन, पुणे

५. बळेल अनिल (२०१०), विसाव्या शतकातील गाजलेले दहा वृत्तपत्र-संपादक,स्नेहल प्रकाशन, पुणे

६. केळकर न.चि. (१९२३), लोकमान्य टिळक यांचे चरित्र, वरदा प्रकाशन, पुणे

७. अकलूजकर प्रसन्नकुमार (२०००), वृत्तपत्रविद्या, श्रीविद्या प्रकाशन, पुणे
८. विलानियम जे.व्ही. (२००८), भारतातील प्रसारमाध्यमे काल आणि आज, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
९. जोशी भा.श्री. (२००४), माध्यम पत्रकारिता आणि आपण, कौस्तुभ प्रकाशन, नागपूर
१०. श्रृंगारपुरे अरविंद (२००१), समग्र भारतीय व पाश्चात्य राजकीय विचारवंत, विद्या प्रकाशन, नागपूर
११. सातभाई श्रीनिवास (इ.स. १७५७ ते १९७७), आधुनिक भारताचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
१२. टिळक ज.श्री. (१९७६), समग्र लोकमान्य टिळक, खंड ४, नवे नेतृत्व, केसरी प्रकाशन, पुणे
१३. डॉ. भोळे भा. ल. (१९९८), भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, पिंपळपुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स
१४. डॉ. पवार सुधाकर (१९९०) पत्रकारितेची मूलतत्त्वे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
१५. आगलावे प्रदीप (२००७) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
१६. आवालगावकर अविनाश (२००६), मराठी साहित्य संशोधनः नव्या दिशा, प्रतिमा प्रकाशन, पुणे
१७. गोळवलकर रमा, (२०१४), जनसंवाद, सिद्धांत आणि व्यवहार, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर
१८. जोशी सु.ह. (२००९), मराठी पत्रकारिता पहिली पावले, डायमंड पब्लिकेशन, पुणे
१९. पारीख गोवर्धन (१९६९), भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार बाळ गंगाधर टिळक (१९६९), मौज प्रकाशन, मुंबई
२०. सातभाई श्रीनिवास (२०१५), इतिहास लेखनशास्त्र, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद
२१. शुभांगी राठी, (२०१४), भारतीय राजकीय विचार, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे

२२. आंबेडकर बाबासाहेब (२००९), जनहित प्रवर्तक साप्ताहिक पत्र, जनता, समता प्रकाशन, नागपूर

२३. न.र.फाटक, (१९७२), लोकमान्य टिळक यांचे चरित्र, मौज प्रकाशन, मुंबई

२४. ग.प्र. प्रधान (१९७१), लोकमान्य टिळक व्यक्ति आणि कार्य, केसरी, पुणे

२५. धनंजय कीर (१९७१), लोकमान्य टिळक आणि राजर्षी शाहू, गजानन बुक डेपो, पुणे

२६. भा.द. खेर (१९७२) लोकमान्य टिळक दर्शन, केसरी प्रकाशन, पुणे

२७. पोतदार दत्तो वामन (१९७५) सांगाती, केसरी प्रकाशन, पुणे

संशोधक,

संतोष लक्ष्मण राणे

के.ग.जोशी कला, ना.गो.बेडेकर वाणिज्य
वरिष्ठ महाविद्यालय, चेंदणी कोळीवाडा,
मीठबंदर रोड, सिडको बसस्टॉपच्या बाजूला,
ठाणे (प.)

मो. नं. : ९८२०१७६९३४

ईमेल : santoshrane99999@gmail.com

मार्गदर्शक,

डॉ. माधव बसवंते

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड,
जि. नांदेड

मो.नं.: ९४०४९००३१८

ईमेल : madhavgvt@gmail.com